# जिल्हा व सत्र न्यायालय, गोंदिया

* * * * *

**अंतर्गत**

**ई–सेवा केंद्र (Porta Cabin) गोंदिया, आमगांव, तिरोडा, सडक अर्जुनी व अर्जुनी मोरगांव येथे प्रत्येकी १ असे एकूण ५ कंत्राटी कर्मचा–यांची (Contractual Staff) पदे मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात ११ महिन्यांचे कालावधीकरीता भरावयाची आहेत.**

ई–मेल आयडी – dj.gondia-mah@aij.gov.in

दुरध्वनी क्र. ०७१८२ २३३४१०

* * * * * * * * *

## पदाचे नाव व पात्रता

| अ. क्र. | पदाचे नाव | एकूण पद संख्या | शैक्षणिक अर्हता / पात्रता | एकत्रित मासिक मानधन |
|---|---|---|---|---|
| **१.** | **कंत्राटी कर्मचारी (Contractual Staff)** | **५** | १.कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठातून पदवीधर असावा.<br>२.मराठी भाषेचे ज्ञान असावे.<br>३.शासकीय व्यावसायीक प्रमाणपत्र परीक्षा किंवा शासकीय मंडळाने घेतलेली परीक्षा किंवा संगणक टंकलेखन बेसिक कोर्स (GCC-TBC किंवा I.T.I.) मध्ये शासकीय प्रमाणपत्र, प्रति मिनीट ३० शब्द मराठी टंकलेखन आणि प्रति मिनीट ४० शब्द इंग्रजी टंकलेखन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.<br>४.खालीलपैकी कोणत्याही संस्थेकडून MS-Office, MS-Windows, MS-Word, Word Star-7 आणि ओपन आफीस ऑर्गनायझेशन व्यतिरिक्त Windows आणि Linux मध्ये वर्ल्ड प्रोसेसरच्या ऑपरेशन्समध्ये प्राविण्याबद्दल संगणक प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. | **१५,०००/– (अक्षरी पंधरा हजार फक्त)** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | i) NIC<br>ii) DOEACC<br>iii) APTECH<br>iv) NIIT<br>v) C-DAC<br>vi) DATAPRO<br>vii) SSI<br>viii) BOSTON<br>ix) CEDIT<br>x) MS-CIT<br>xi) महाराष्ट्र किंवा गोवा सरकारने, यथास्थिती दिलेले संगणक ज्ञानाच्या पात्रतेचे प्रमाणपत्र. | |

## कामाचे स्वरुप

१) न्यायालयीन प्रकरणांची स्थिती, पूढील सुनावणीची तारीख आणि इतर तपशिलांबद्दल चौकशी हाताळणे.

२) सत्यप्रती आणि इतर अशा फाइलिंगसाठी ऑनलाईन अर्जाची सोय करणे.

३) पिटीशन्सच्या हार्डकॉपी स्कॅन करणे, स्वाक्षरी जोडणे, सीआयएसमध्ये अपलोड करणे आणि फाईलिंग नंबर तयार करणे यापासून थेट याचिका दाखल करणे.

४) ई स्टॅम्प्स/ई पेमेंट्सच्या ऑनलाईन खरेदीमध्ये मदत करणे.

५) आधार कार्ड आधारीत डिजीटल स्वाक्षरी अर्ज आणि प्राप्त करण्यासाठी मदत करणे.

६) अॅन्ड्रॉईड आणि आयओएस साठी ई कोर्टचे मोबाईल अॅप डाउनलोड करण्यासाठी व प्रसिध्द करण्यासाठी मदत करणे.

७) तुरुंगात बंद असलेल्या नातेवाईकांच्या भेटीसाठी ईमुलाकात भेटीची बुकींग करण्यासाठी सुविधा देणे.

८) रजेवर असलेल्या न्यायाधीशांबद्दलच्या प्रश्नांची हाताळणी करणे.

९) विशिष्ट न्यायालयाचे स्थान, त्याची कारण सुची आणि खटला सुनावसाठी घेतला जातो की नाही याविषयीच्या प्रश्नांची हाताळणी करणे.

१०) जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, मा. उच्च न्यायालय विधी सेवा समिती आणि मा. सर्वोच्च न्यायालय विधी सेवा समिती कडून कायदेशीर सेवा कशा मिळवायच्या याबद्दल लोकांना मार्गदर्शन करणे.

११) व्हर्चुअल न्यायालयात ट्रॅफीक चलानची विल्हेवाट लावणे तसेच ट्रॅफीक चलान आणि इतर किरकोळ गुन्हयांचे ऑनलाईन आपसी समझौत्याने मिटविण्याबाबत सहाय्य करणे.

१२) ई कोर्ट प्रकल्पाअंतर्गत डिजीटली उपलब्ध असलेल्या सुविधा पुरविणे आणि त्यासबंधाने सर्व प्रश्नांचे निराकरण करणे.

१३) व्हिडीओ कॉन्फरन्स कोर्ट सुनावणीची व्यवस्था आणि आयोजन करण्याची पध्दत समजावून सांगणे.

१४) ई मेल, व्हॉट्स ॲप किंवा इतर कोणत्याही उपलब्ध मोडद्वारे न्यायालयीन आदेश/ निर्णयांची सॉफ्ट कॉपी पुरविणे.

## अटी व शर्ती

**१.** सदर पदे ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असून फक्त ११ महिन्यांचे कालावधीसाठी मानधनावर कंत्राटी तत्वावर भरण्यात येत आहेत. उमेदवाराचा या पदावर नोकरीत कायम करणेबाबत कोणत्याही प्रकारचा हक्क राहणार नाही.

**२.** या जाहीरातीसोबत अर्जाचा नमुना दिलेला असून त्या पध्दतीचा अर्ज अर्जदाराने दिनांक २३.०२.२०२६ दुपारी ५.०० वाजतापर्यंत प्रत्यक्ष किंवा नोंदणीकृत डाकेने **पुढील पत्त्यावर** पोहचतील अशा प्रकारे दाखल करावे. त्यानंतर आलेल्या अर्जाचा कोणत्याही प्रकारे विचार केला जाणार नाही.

**अर्ज दाखल करण्याचा पत्ता : जिल्हा व सत्र न्यायालय,<br>सिव्हील लाईन, गोंदिया.**

३. पात्र अर्जदारांची चाचणी परीक्षा घेण्यात येईल.

४. अर्जावर व पोस्टाच्या लिफाफ्यावर कोणत्या पदाकरीता अर्ज केला आहे ते स्पष्टपणे नमुद करावे. तसे नसल्यास अर्ज अपूर्ण समजून त्याचा विचार केला जाणार नाही.

५. अर्जासोबत शैक्षणिक पात्रतेबाबत स्वयंसाक्षांकीत प्रती दाखल करावे.

६. उमेदवारांची निवड झाल्यावर त्यांना संबंधित जिल्हयाचे पोलिस अधिक्षक यांचेकडून चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र सादर करावे लागेल, चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र सादर केल्यानंतर त्यांना नियुक्ती देण्यात येईल.

७. निवड करण्यात आलेल्या उमेदवाराने जिल्हा न्यायालयाकडे स्टॅप पेपरवर करारनामा लिहून द्यावा लागेल.

८. नेमणूकीनंतर उमेदवारास कोणतेही कारण न देता व कोणतीही पूर्वसुचना न देता नोकरीतून कमी करण्याचा अधिकार जिल्हा न्यायालयास राहील.

९. उमेदवारास करार संपण्यापूर्वी त्यास नोकरी सोडायची असल्यास, दोन महिन्यांपूर्वी आगाऊ सूचना किंवा एक महिन्याचे मानधन या कार्यालियास जमा करावा लागेल.

१०. मानधन : मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी ठरवून दिल्याप्रमाणे.

११. भरती प्रक्रियेच्या माहितीकरीता अर्जदारांनी जिल्हा न्यायालय, गोंदिया यांच्या अधिकृत संकेतस्थळ https://gondia.dcourts.gov.in वर भेट द्यावी.

स्वाक्षरी/—
(आर. एन. जोशी)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
गोंदिया

स्थळ :— गोंदिया
दिनांक :— १६/०२/२०२६